# महानुभाव पंथ : तत्त्वज्ञान, वाङ्मय आणि कार्य
# (Mahanubhav cult: Philosophy, literature and work)

डॉ. सौ. वीरा मांडवकर
सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
इ मेल : pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा –

महानुभाव पंथाचा उगम समृद्धावस्थेत झाला. यादवकाळात इसवीसनाच्या तेराव्या शतकात चक्रधरस्वामींच्या पुढाकाराने उदयास आलेल्या ह्या पंथाची पुढील काही शतके मोठी भरभराटीची गेली. चांगदेव राऊळ, श्री गोविंदप्रभू, चक्रधर, नागदेवाचार्य, महदाइसा यांसारखे थोर लोक या पंथात झाले. हा पंथ वेदांबद्दल आदर बाळगणारा असला तरी त्यांना प्रमाण मानणारा नाही. महानुभाव पंचकृष्णांच्या वचनांनाच प्रमाण मानतात. हा पंथ द्वैती पंथ असल्याने जीव आणि ईश्वर यांचे द्वैत ते मानतात. महानुभाव वाङ्मय पंथनिष्ठेवर आधारलेले आहे. पंथातील शिष्यांसाठी असणारे नियम आणि आचारधर्म यांविषयीच्या कल्पना कडक असल्यामुळे तसेच महानुभावीय संन्याशांची भिन्न राहणी, विटाळ–चांडाळाच्या व शूचिअशूचित्वाच्या वेगळ्या कल्पना, त्यांचा पेहराव, पद्धती व रूढ चालीरीती पाळण्यातील शिथिलता यांमुळे कालांतराने महानुभाव पंथाविषयी अप्रीती निर्माण झाली.

## Abstract -

The Mahanubhav sect originated in prosperity. This sect, which emerged in the thirteenth century AD during the Yadav period with the initiative of Chakradhara Swami, flourished for the next few centuries. Great people like Changdev Raul, Shri Govindprabhu, Chakradhar, Nagdevacharya, Mahadaisa became in this sect. Although this sect respects the Vedas, it does not regard them as standard. Mahanubhav considers the words of Panchkrishna as the standard. Since this sect is a dualistic sect, they believe in the duality of life and God. Mahanubhav is based on literary sectarianism. The strict adherence to the rules and ethics of the disciples of the sect, as well as the different ways of living of the noble saints, the different ideas of untouchability and holiness, their dress, manners and laxity in following the customs, eventually led to dislike of the noble sect.

## बीजशब्द –

पंथ, ज्ञानमार्ग, प्रवर्तक, लीळा, गुरुकृपा, आचारधर्म

## प्रस्तावना –

महानुभाव पंथाचा उगम अतिशय समृद्ध असा झाला. यादवकाळात इसवीसनाच्या तेराव्या शतकात चक्रधरस्वामींच्या पुढाकाराने उदयास आलेल्या ह्या पंथाची पुढील दोन–तीन शतके मोठी भरभराटीची गेली. 'महानुभाव'सोबतच या पंथाची महात्मा, अच्युत, जयकृष्णी, भटमार्ग, परमार्ग अशीही नावे आहेत. एकनाथांच्या काळापासून हा 'मानभावपंथ' या नावाने ओळखला जातो. 'महानुभाव याचा अर्थ 'महान अनुभव: तेज: बलं वा यस्य स: महानुभाव:' याप्रमाणे केला असता मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा पंथ हा महानुभाव पंथ असे म्हणता येईल.' [१] महानुभावांच्या वाङ्मयनिर्मितीने मराठी साहित्याला समृद्धी दिली. 'मराठीत गद्यचरित्रलेखनाच्या मुहूर्तमेढीचे श्रेय महानुभावांचे आहे. म्हाइंभटाने स्मरणशक्तीतून आणि सत्यनिष्ठेची प्रतिज्ञा घेऊन लिहिलेले 'लीळाचरित्र' हे चरित्रलेखनाचा आदर्श तर ठरलेच, पण उभ्या मराठी वाङ्मयाचा मानदंड बनून राहिले.' नरेंद्र, भास्करभट्ट यांसारखे रसिक कवी, दामोदर पंडितांसारखे भाष्यकार, महदंबेसारखी मराठीतील पहिले कथाकाव्य लिहिणारी कवयित्री असे अनेक रचनाकार महानुभावीय प्रेरणेने प्रेरित होऊन लिहिते झाले. स्त्रियांनी रज:स्वला स्थितीत विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही असे महदाइसेला सांगून चक्रधरांनी एक नवीन विचार जगापुढे मांडलेला दिसतो.

## १ महानुभाव पंथातील महत्त्वाच्या व्यक्ती —

### अ. चांगदेव राऊळ :

चांगदेव राऊळ यांचा जन्म फलटण (जि. सातारा) येथील जनकनायक व जनकाइसा या ब्राम्हण दांपत्याच्या पोटी चक्रधर व चक्रपाणी या देवतांच्या प्रसादाने झाला. त्यामुळे त्यांना चांगदेव चक्रपाणी म्हणत असत. त्यांचा विवाह कमळाइसा हिच्याशी झाला होता; परंतु ते वृत्तीने विरक्त होते. संसारात वैराग्य उत्पन्न होऊन फलटणहून इतर नागरिकांसमवेत माहूरच्या यात्रेला जाण्यासाठी निघाले. पुढे दत्तात्रयप्रभूंपासून उभय शक्तीचा स्वीकार करून परमशक्ती आच्छादली व अवरशक्ती प्रकट केली, म्हणून त्यांना 'आच्छादनीचा अवरदृश्यावतार' असे म्हणतात. माहूरच्या वास्तव्यानंतर चांगदेव द्वारकेला राहिले. उजव्या हाती खराटा व डाव्या हाती सूप घेऊन ते द्वारकेतले रस्ते झाडून काढीत. 'त्यांच्या दर्शनाला येणाऱ्या लोकांच्या डोक्यावर ते सूप व खराटा मारीत असत. त्यामुळे त्या लोकांना देवतांच्या विद्या प्राप्त होत असत. अशा ५२ पुरुषांना त्यांनी विद्यादान केले.'[२]

फलटणहून निघाल्यापासून ते नैष्ठिक ब्रम्हचर्य पाळीत होते. पुढे 'कामाख्या' नावाच्या एका हठयोगिनीमुळे त्यांनी शरीराचा त्याग केला. त्यानंतर 'भरवस' येथील स्मशानात आणलेल्या 'हरपालदेव' यांच्या मृत शरीरात प्रवेश केला. हेच हरपालदेव पुढे 'चक्रधर' या नावाने प्रसिद्धीस आले. गोविंदप्रभू व उधळीनाथ हे त्यांचे प्रमुख शिष्य होते.

### ब. श्री गोविंदप्रभू (इ.स. ११८७ ते १२८७) :

अमरावती जिल्ह्यातील चांदुरबाजार तालुक्यातील रिद्धपूर अथवा ऋद्धिपूरजवळील काटसरे गावी अनंत नायक व नेमाइसा या ब्राम्हण दांपत्याच्या पोटी गुंडो उर्फ गोविंद यांचा जन्म झाला. चांगदेव राऊळ यांच्यापासून द्वारावतीला दीक्षा घेतल्यानंतर परत रिद्धपूरला येऊन उपदेश करण्याचे कार्य करण्यास सुरुवात केली. पंथात ते 'गुंडम प्रभू' किंवा 'गोविंदप्रभू' म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचा वेश, खाणे—पिणे एखाद्या वेड्यपिशासारखे असे. गोविंदप्रभूंना ईश्वरी अवतार समजले जाते. त्यांचे चरित्र अनेक चमत्कारांनी भरलेले आहे. एखाद्याच्या मृत्यूची सूचना ते आधीच देत असत. याशिवाय 'मेलेल्यांना उठविणे, पर्जन्य बोलाविणे, दुरून गाईचे दूध काढणे, मुक्याला वाचा देणे इत्यादी नानाविध चमत्कार त्यांनी केले.'[३] गोविदप्रभू यांच्यापासून श्री चक्रधर यांनी शक्तिस्वीकार केला. महानुभावांच्या तीन आद्यपुरुषांच्या परंपरेत द्वारावतीकार चांगदेव राऊळ, श्री गुंडम राऊळ व चक्रधर यांचा समावेश होतो. हे सर्वजण वैराग्यसंपन्न होते.

### क. चक्रधर (इ.स. ११९४ ते १२७२) :

गुजराथमध्ये आठशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या विशालदेव नावाच्या राजास माल्हणदेवीपासून दत्ताच्या प्रसादाने झालेल्या मुलाचे नाव हरपालदेव असे होते. हरपालदेवाचा जन्म इ.स. ११९४ (शके १११६) मध्ये झाला. पुढे सन १२२१ मध्ये हरपालदेव मृत झाला असता त्याच्या देहात श्री चांगदेव राऊळ यांनी प्रवेश केला, असे सांगितले जाते. तेथूनच त्यांच्या अवतारकृत्याचा प्रारंभ झाला. चक्रधर हे या पंथाचे आद्य प्रवर्तक होत. महानुभाव पंथाचा स्थापनाकाल इ.स. १२६३ समजला जातो.

चक्रधरांनी पैठण येथे दीक्षा स्वीकारल्यानंतर पुढे ते सतत महाराष्ट्रात परिभ्रमण करीत होते. जीवांचा उद्धार करीत व ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार ज्ञानमार्गाचा किंवा प्रेममार्गाचा उपदेश करीत त्यांचा संचार चालू होता. स्वामींच्या परिवारातील शिष्यवर्गात नागदेवाचार्य व महदाइसा उर्फ महदंबा प्रमुख होते. वेधवती वाणीचे, तरुण, वत्सल, व्यासंगी आणि शिस्तप्रिय गुरू, बहुश्रुत आणि बहुविद्यादानी मार्गदर्शक, कुशल संघटक, सामान्य जनांत वावरून त्यांचा प्रेममार्गाने उद्धार करणारे, एक विरक्त सत्पुरुष आणि अहिंसेचे आद्य प्रवर्तक अशी चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील.

श्री चक्रधरांच्या आठवणी (लीळा) त्यांचे शिष्य म्हाइंभट यांनी संकलित करून चरित्ररूपाने मांडल्या. 'लीळाचरित्र' नावाचा हा मराठीतील पहिला चरित्रग्रंथ होय.

### ड. नागदेवाचार्य (तेरावे शतक) :

गोदावरीच्या काठी असणाऱ्या पुरी येथील माधवभट आणि आबाइसा यांचे पुत्र म्हणजे नागदेवाचार्य होत. पूर्वकाळात अनेक व्यसनांनी वेढल्या गेलेले नागदेव दादोस यांचेबरोबर चक्रधरांच्या भेटीला गेले. त्यांचा प्रभाव पडून त्यांनाच अनुसरून पुढे त्यांचे पट्टशिष्य बनले. त्यांची मुख्य कामगिरी म्हणजे मुख्यत: स्वामींच्या लीळांचे संशोधन व लेखन व्यवस्थितपणे म्हाइंभटांकडून करवून घेतले. 'लीळाचरित्राचे ग्रंथकर्तृत्व जरी म्हाइंभटांचे असले तरी त्याचे बरेचसे श्रेय नागदेवाचार्यांसच द्यावे लागेल.'[४] दुसरे म्हणजे 'रत्नमालास्तोत्रा'चेही संशोधन त्यांनी केले. त्यांनी केलेली आणखी एक

महत्वाची गोष्ट म्हणजे चक्रधरांच्या आवडीचा मान ठेवून मराठी भाषेतच ग्रंथरचना करण्याची प्रेरणा त्यांनी आपल्या शिष्यवर्गास दिली. 'नागदेवांनी स्वत: एकही ग्रंथ लिहिला नाही; परंतु अनेक ग्रंथकारांना प्रेरणा देऊन ते ग्रंथकारांचे ग्रंथकार' झाले, यात शंका नाही. चक्रधरांच्या प्रयाणानंतर त्यांच्या विचारांचा प्रसार नागदेवाचार्यांनी प्रवचने, निरुपणे, चर्चा, ग्रंथनिर्मिती, प्रवास, भेटीगाठी इत्यादी साघनांनी सुमारे तीस ते चाळीस वर्षे केला. इतरांना ते वेधून घेत त्यांच्या या सामर्थ्यामुळे त्यांना 'वेघवती नागदेव' म्हटले जाई. (स्मृतिस्थळ २१९)

इ. महदाइसा (इ.स. १२४२ – १३१२ किंवा इ.स. १२२८ – १३०३) :

महदाइसा उर्फ महदंबा म्हणजे मराठीतील आद्य कवयित्री आणि चक्रधरांची शिष्या व पट्टशिष्य नागदेवाचार्य यांची चुलत बहीण. गोविंदप्रभूंनी श्रीकृष्णाच्या विवाहाचा सोहळा केला असता त्यावेळी स्वत:ला करवली समजून महदंबेने जी १४९ (काहींच्या मते १४८) गीते रचून म्हटली त्यास 'धवळे' असे म्हणतात. महदंबेच्या नावावर 'धवळे', 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' व 'गर्भकांड ओव्या' या रचना आहेत. ज्ञानेश्वर–मंडळात मुक्ताबाईस जो मान होता, तो मान चक्रधर–मंडळात तिला होता. अतिशय जिज्ञासू, सेवाव्रती, शीघ्रकाव्यरचनेत रस असणारी, आद्यकवयित्री अशा अनेक कारणांसाठी महदंबेचे नाव महानुभाव पंथात अग्रेसर आहे. गुरू चक्रधरस्वामींप्रती तिची समर्पणाची व भक्तीची भावना ठायी ठायी जाणवते. 'स्मृतिस्थळा'त 'रूपै, पहिल्या दिसापासौनि सेवटील दिसापर्यंत देवो तुवाचि धरला असे' (स्मृतिस्थळ २५४) असे नागदेवाचार्यांनी तिच्या मृत्युसमयी तिला उद्देशून म्हटले आहे.

'सारे काही अनुकूल असताना त्या परिस्थितीत समाधान न मानता रूढ सामाजिक चौकटीबाहेर पडून स्वत:ची वाट शोधणारी महदाइसा ही मराठी साहित्यातील एक विलक्षण स्त्री म्हणावी लागेल. आपल्या परीची ती एकच. प्रथम चक्रधरांच्या सान्निध्यात व नंतर त्यांच्या स्मरणात तिने आपल्या आध्यात्मिक प्रवासाचे एकेक पुढचे टप्पे गाठले व एका आगळ्या स्त्री प्रतिमेचा नमुना तिने उभा केला.'[५]

## २. महानुभावीय तत्त्वज्ञान –

'सूत्रपाठ' या ग्रंथास 'महानुभावांचा वेद' असे म्हटले जाते. त्यातून महानुभावांचे सारे तत्त्वज्ञान विशद झाले आहे. हा पंथ द्वैती मताचा आहे. महानुभाव जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या वस्तू मुख्य व नित्य अशा मानतात.

प्रपंचास महानुभाव अनित्य मानतात. देवतांना महानुभावांनी गौण मानले आहे. त्यांच्या मते देवता नित्यबद्ध आहेत. त्या ज्ञान ऐश्वर्य देऊ शकल्या तरी परमेश्वर होऊ शकणार नाहीत. वेदांत 'ब्रम्ह' हे अंतिम मानले असून ईश्वर हे त्याचे गौण स्वरूप म्हणून समजले गेले आहे. महानुभावीय तत्त्वज्ञानात याउलट स्थिती आहे. ते ईश्वरास प्रमुख स्थान देतात व ब्रम्हास त्याचा एक भाग मानतात. जीव–देवता, प्रपंच–परमेश्वर यांचे परस्परांशी किंवा सर्वांशी कधीच ऐक्य साधले जात नाही, असे हा पंथ मानतो. म्हणूनच त्यास द्वैती पंथ असे म्हणतात.

चक्रधरांनी आत्मज्ञान भक्ती आणि गुरुकृपा यांना अधिक महत्त्व दिले आहे. हा पंथ वेदांबद्दल आदर बाळगणारा आहे; पण वेदांना प्रमाण मानणारा नाही. महानुभाव पंचकृष्णांच्या वचनांनाच प्रमाण मानतात. चक्रधरांची वचने ही महानुभावांची 'श्रुती' होय. नागदेवाचार्यांच्या वचनांस ते 'स्मृती' म्हणतात.

## ३. महानुभावांचा आचारधर्म –

महानुभाव पंथ प्रामुख्याने मुमुक्षूंचा अथवा साधकांचा पंथ आहे. त्यामुळे या पंथातील शिष्यांसाठी असणारे नियम आणि आचारधर्म यांविषयीच्या कल्पना कडक असणे स्वाभाविक आहे. संन्यस्त व गृहस्थ असे शिष्यांचे दोन वर्ग या पंथात केलेले असून संन्याशाने नित्य भ्रमंती, भिक्षाभोजन करावे, एकांतवास पत्करून परमेश्वराचे नामस्मरण करावे अशी अपेक्षा आहे.

जीव, देवता, प्रपंच आणि ईश्वर असे चार पदार्थ महानुभावीयांच्या दृष्टीने स्वतंत्र आहे. ते अनादी व अनंत आहेत. नित्य आहेत. प्रपंच हा जड परमेश्वर नित्यमुक्त, देवता नित्यबद्ध आणि जीव बद्धमुक्त आहे. हा पंथ द्वैती पंथ असल्याने जीव आणि ईश्वर यांचे द्वैत ते मानतात. त्यांच्या आचार–विचार–तत्त्वज्ञानावर विचार मांडताना 'कर्मकांड आणि सुखविलास यांमध्ये रमणाऱ्या सामान्य संसारी जनांना हा आचारधर्म 'खड्गाच्या धारेप्रमाणे दुर्धर' वाटल्यास नवल नाही,'[६] असे ल.रा. नासिराबादकरांनी म्हटले आहे.

## ४. महानुभावीय वाङ्मय –

सर्व महानुभाव वाङ्मय पंथनिष्ठेवर आधारलेले आहे. तीच त्यांची प्रेरणा आहे. पंथाच्या प्रवर्तकांची चरित्रे, लीळा, वचने, आख्यायिका, पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचे जतन करणे, त्यांचे दर्शन घडविणे आणि त्यांचा प्रसार करणे हीच वाङ्मयनिर्मितीमागची त्यांची प्रेरणा होती. गद्य व पद्य अशा दोन्ही माध्यमांतून त्याची जाणीवपूर्वक निर्मिती झालेली दिसते.

महानुभावीय वाङ्मयात 'लीळाचरित्र', 'श्रीगोविंदप्रभुचरित्र', 'दृष्टांतपाठ', 'सूत्रपाठ', 'मूर्तिप्रकाश', 'स्मृतिस्थळ', 'महदंबेचे धवळे', 'मातृकी रुक्मिणीस्वयंवर', साती ग्रंथ इत्यादी महत्त्वपूर्ण वाङ्मय आढळते. साती ग्रंथांमध्ये 'शिशुपालवध', 'उद्धवगीता अथवा एकादशस्कंद', 'वछाहरण', 'रुक्मिणी स्वयंवर', 'ज्ञानप्रबोध', 'सैह्याद्रिवर्णन', 'श्रीऋद्धिपुरवर्णन' यांचा समावेश होतो.

महानुभाव संप्रदायातील म्हाइंभट यांना मराठीतील आद्य संशोधक व चरित्रकार म्हणून ओळखले जाते. त्यांनी 'लीळाचरित्रा'प्रमाणेच 'ऋद्धिपुरचरित्र' म्हणजेच गोविंदप्रभूंचे चरित्रही लिहिले. या चरित्रग्रंथामुळे तेराव्या शतकातील मराठी भाषा, व्याकरण व वाङ्मय यांवरच नाही तर इतिहास, धर्म, समाज इत्यादिकांवरही फार मोठा प्रकाश पडतो.

## ५. महानुभाव पंथाचे कार्य –

सुमारे सहाशे वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीतील सलणाऱ्या, बोचणाऱ्या विधिनिषेधाच्या गोष्टींवर प्रहार करून आचारधर्माचा एक नवीन प्रवाह निर्माण केला गेला, तो म्हणजे महानुभाव पंथ. त्यांनी गीता, उपनिषदादी ग्रंथातील तत्त्वज्ञान स्वत: आचारधर्माच्या रूपाने आचरून दाखविल्यामुळे तत्कालीन महाराष्ट्रातील ७–८ वर्षांच्या परिभ्रमणात एकूण ५०० शिष्य, १३ शिष्यिणी यांचा परिवार त्यांना जमविता आला.

या पंथातील महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वेदकालापासून वैदिक पंथांनी मानलेल्या देवतांची उपासना यात त्याज्य ठरविली. देवतांपेक्षा परमेश्वर हा 'अनादिनित्य' आहे, असे ते मानतात. पंचकृष्णांखेरीज इतर देवतांना त्यांनी तुच्छ लेखले.

या पंथात स्त्रीशूद्रादिकांना धर्ममंदिरात इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळाला. मोक्षाधिकार स्त्रियांना आणि शूद्रांना आतापर्यंत वैदिक मतानुयायांनी नाकारला होता. त्यामुळे स्त्रीशूद्रादिकांचा मोठा वर्ग इतर लहान लहान देवादिकांच्या उपासनेतच गुरफटून गेला होता. त्यातून त्यांना मुक्त करून मोक्षप्राप्तीचा मार्ग सर्वांना मोकळा आहे, असे चक्रधरांनी उद्घोषित केले. 'तुमचा काई जीवु आणि यांचिया काई जीवुलिया : तुमचे आनदेवो राखता आणि याते आन देवो राखता? ऐसे काई एथ असे?:'[७] पुरुषांचा जीव आहे व स्त्रियांना जीवही नाही. पुरुषांचा एक देव व स्त्रियांचा दुसरा देव असे मानण्याचे काही कारण नाही, असे त्यांनी सारंगपंडिताला एका प्रसंगी सांगितल्याचा लीळाचरित्रात उल्लेख आहे.

महानुभाव पंथात परंपरागत चालत आलेल्या चातुर्वर्ण्याला मान्यता तर दिली नाहीच, पण त्याविरोधात आपले टीकास्त्र उपसले. त्यांनी जे विधिनिषेध आपल्या अनुयायांना घालून दिले होते, त्यामुळे आपोआपच या चातुर्वर्ण्याचा अडसर दूर झाला होता.

या पंथाचा एक विशेष म्हणजे यात स्त्रीपुरुषांना संन्यास घेण्याची मोकळीक ठेवली गेली होती. वैदिक पंथीयांनी जो संन्यास स्त्रियांना निषिद्ध ठरविला आहे, त्यालाच येथे मान्यता मिळालेली दिसते. महानुभाव पंथीयांनी स्त्रीपुरुषादिकांकरिता पुरस्कारिलेला संन्यास मार्ग सर्वांना पेलण्यासारखा नव्हता. पंथातील आचार्यांच्या योग्यता आणि समाजातील तेल्यामाळ्यांची योग्यता या सारख्या नव्हत्या; आणि त्यामुळे हा संन्यास या पंथाच्या पचनी पडला नाही.

या पंथाने चातुर्वर्ण्यासोबतच शूचिअशूचित्व, श्रेष्ठकनिष्ठादी कल्पनांचादेखील त्याग केलेला दिसतो. तद्वतच सोवळ्याओवळ्याच्याही कल्पना ते मानताना दिसत नाही. स्त्रियांनी मासिक धर्मामुळे विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही, असा उपदेश नागदेवाचार्य करताना दिसतात.

महानुभावांच्या कामगिरीपैकी शेवटची पण अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांची वाङ्मयसंपदा. मराठी भाषेतील आद्यकवयित्री याच पंथाने दिली. साती ग्रंथ याच पंथातून आले. काव्यगुणाच्या दृष्टीने सरस व उत्कृष्ट ग्रंथ लिहूनही त्यांचे वाङ्मय विपुल व बहुविध आहे. मराठी भाषेत उपलब्ध झालेली पहिली ग्रंथसंपत्ती याच पंथाने निर्माण केली आहे. त्यादृष्टीने 'मराठी वाङ्मयाची गंगोत्री' म्हणून महानुभावीयांच्या ज्ञानेश्वरपूर्व ग्रंथनिर्मितीकडे बोट दाखविण्यास हरकत नाही.

## ६. महानुभाव पंथाच्या अप्रीतीची कारणे –

महानुभाव पंथाच्या अप्रीतीची अनेक कारणे सांगण्यात येतात. महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल. भावे यांनी ऐतिहासिक कारणे सांगितली आहेत. त्यात मुसलमानी राज्यकर्त्यांकडून युक्तिबळावर मिळवलेल्या काही खास सवलतींचा उल्लेख

आहे. औरंगजेबासारख्या राज्यकर्त्याने जिझिया करात माफी देऊन हा पंथ अहिंदू असल्याचे घोषित केले. यादवकाळातील काही खास व्यक्तींची या पंथाकडे ओढ हेही एक ऐतिहासिक कारण सांगितले जाते. तसेच महानुभावीय संन्याशांची भिन्न राहणी, विटाळ—चांडाळाच्या व शूचिअशूचित्वाच्या वेगळया कल्पना, त्यांचा पेहराव, पद्धती व रूढ चालीरीती पाळण्यातील शिथिलता ही सर्व सामाजिक कारणे म्हणून नोंदवली गेली आहेत. याशिवाय चक्रधरांच्या चारित्र्यावरील संशय, पंथीयांना आचारधर्मानुसार पाळाव्या लागणाऱ्या जाचक गोष्टी आणि चक्रधर—नागदेवाचार्य यांच्यानंतर प्रभावी पंथप्रचारक न मिळाल्यामुळे या पंथाची प्रगती खुंटली. तसेच सर्वांना न झेपणारा संन्यासमार्ग, गावापासून दूर विजनवास पत्करण्याचा उपदेश, कायाक्लेश व अतिरेकी देहदंडनाची शिकवणूक, कदान्न व भिक्षान्न यांवर निर्वाह करण्याचा दंडक, इतर पंथीयांच्या मानाने देवतांविषयीची स्वीकारलेली संकुचित वृत्ती अशा अनेक कारणांमुळे या पंथाबद्दलची अप्रीती वाढत गेली व लवकरच या पंथाला आपला गाशा गुंडळावा लागला. साध्य आणि साधने, ध्येय आणि वस्तुस्थिती, तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांची योग्य ती सांगड — महानुभाव पंथाची ध्येये जरी उच्च होती तरी — त्यास घालता आली नाही. पुढे वारकरी संप्रदायाच्या आगमनाने व त्यांच्यातील सोप्या आचारविचार, लेखनपद्धती, प्रचारतंत्रामुळे लोक वारकरी संप्रदायाकडे आकर्षित होत गेले आणि महानुभाव पंथाकडील लोकांचा ओढा कमी झाला.

## निष्कर्ष —

१. यादवकाळात इसवीसनाच्या तेराव्या शतकात चक्रधरस्वामींच्या पुढाकाराने महानुभाव पंथ उदयास आला.

२. चक्रधर हे या पंथाचे आद्य प्रवर्तक होत.

३. वेधवती वाणीचे, तरुण, वत्सल, व्यासंगी आणि शिस्तप्रिय गुरू, बहुश्रुत आणि बहुविद्यादानी मार्गदर्शक, कुशल संघटक, सामान्य जनांत वावरून त्यांचा प्रेममार्गाने उद्धार करणारे, एक विरक्त सत्पुरुष आणि अहिंसेचे आद्य प्रवर्तक अशी चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक वैशिष्ट्ये आहेत.

४. महानुभावांच्या तीन आद्यपुरुषांच्या परंपरेत द्वारावतीकार चांगदेव राऊळ, श्री गुंडम राऊळ व चक्रधर यांचा समावेश होतो.

५. नागदेवाचार्यांनी मराठी भाषेतच ग्रंथरचना करण्याची प्रेरणा आपल्या शिष्यवर्गास दिली.

६. महदंबेला मराठीतील पहिले कथाकाव्य लिहिणारी कवयित्री असे सन्मानाने म्हटले जाते. महानुभाव संप्रदायातील म्हाइंभट यांना मराठीतील आद्य संशोधक व चरित्रकार म्हणून ओळखले जाते.

७. 'सूत्रपाठ' या ग्रंथास 'महानुभवांचा वेद' असे म्हटले जाते. त्यातून महानुभावांचे सारे तत्त्वज्ञान विशद झाले आहे. महानुभाव हा पंथ द्वैती मताचा आहे.

८. या पंथात स्त्रीशूद्रादिकांना धर्ममंदिरात इतरांच्या बरोबरीने प्रवेश मिळाला त्याचप्रमाणे स्त्रियांनी रजःस्वला स्थितीत विटाळ पाळण्याची आवश्यकता नाही असे महदाइसेला सांगून चक्रधरांनी एक नवीन विचार जगापुढे मांडला.

## संदर्भ —


१. मोकाशी, पं.रा., 'महानुभावपंथ', महाराष्ट्रातील पाच संप्रदाय,. द्वितीयावृत्ती, प्रसाद प्रकाशन, पुणे, १९७५, पृ. ३८.

२. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), 'चांगदेव राउळ', भारतीय संस्कृतिकोश, खंड तिसरा, प्रथमावृत्ती, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, १९६५, पृ. ३५०—३५१.

३. जोशी, महादेवशास्त्री (संपा.), 'गोविंदप्रभू', भारतीय संस्कृतिकोश, खंड तिसरा, उनि., पृ. १८८.

४. मोकाशी, पं.रा., 'महानुभाव पंथ', महाराष्ट्रातील पाच संप्रदाय, उनि., पृ. ४५.

५. शेवडे, इंदुमती, संत कवयित्री, प्रथमावृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. ४०.

६. नसिराबादकर, ल.रा., 'महानुभावांची साहित्यसरिता', प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, सहावी सुधारित आवृत्ती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९७, पृ. १८.

७. कोलते (संपा.), वि.भि., लीळाचरित्र (उत्तरार्ध), प्रथमावृत्ती , महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई, १९७८, पृ. ८४.


## संदर्भग्रंथ —


१. देशमुख, उषा माधव, 'रुजुवात', मराठी साहित्याचे आदिबंध, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह प्रा.लि., मुंबई, १९८२,

२. चतुरकर, शं.कि., मराठी संतांचा आध्यात्मिक विचार, प्रथमावृत्ती, पुं.कि. चतुरकर, अमरावती, १९७९,

३.	भिंगारकर, दा.बा., ‘ संत कवयित्री जनाबाई : चरित्र, काव्य आणि कामगिरी, प्रथमावृत्ती, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९८९
४.	सुंठणकर, बा.रं., महाराष्ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासिक कार्य, द्वितीयावृत्ती, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९९४

□□□

Published Details
Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ) ISSN 2394-8426, Special Isssue – Sahitya Gunjan, Aug. 2017, pp. 27-30
Available at SSRN: https://ssrn.com/abstract=3636560